## नमुना – १

## खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत

## जाहिर नोटीस

उप जिल्हाधिकारी (भूसंपादन)
क्रमांक २६, पुणे यांचे कार्यालय
दिनांक -

**मौजे निरगुडी, ता.हवेली, जि.पुणे**

ज्या अर्थी कार्यकारी अभियंता, पुणे महानगर विकास प्राधिकरण, पुणे यांनी **मौजे निरगुडी, ता.हवेली, जि.पुणे** येथील जमीन प्रारूप विकास योजनेतील ६५ मी. रिंग रोड आणि ९० मी स्पाईन रोड जोड रस्त्याकरीता या सार्वजनिक प्रयोजनाकरिता शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने **कार्यकारी अभियंता, पुणे महानगर विकास प्राधिकरण, पुणे** यांचे नांवे घेण्याबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सादर करण्यांत आला आहे.

शासन निर्णय परिपत्रक दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि तदनुषंगिक शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलक्यूएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करणेची आहे.

त्या अर्थी, आता

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी **सिध्दार्थ भंडारे, उप जिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक २६, पुणे** या व्दारे

(एक) अनुसूची - एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने पुणे महानगर विकास प्राधिकरण विभागातर्फे **कार्यकारी अभियंता, पुणे महानगर विकास प्राधिकरण, पुणे** यांचे नांवे घेणेबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे; आणि

(दोन) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समिती मार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेडयुल –१ च्या तरतूदीनुसार संबंधीत जमिनीसाठी परिगणित होणा-या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५% वाढीव मोबदला निश्चित करण्यात येईल.

(तीन) संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे पुणे महानगर विकास प्राधिकरण विभागातर्फे कार्यकारी अभियंता, पुणे महानगर विकास प्राधिकरण, पुणे यांचे नांवे खरेदी देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

२. संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) **उप जिल्हाधिकारी, (भूसंपादन) क्रमांक २६, पुणे / कार्यकारी अभियंता, पुणे महानगर विकास प्राधिकरण, पुणे** यांचेकडे दाखल करावीत.

३. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना **उप जिल्हाधिकारी, (भूसंपादन) क्रमांक २६, पुणे / कार्यकारी अभियंता, पुणे महानगर विकास प्राधिकरण, पुणे** यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत / पुणे महानगर विकास प्राधिकरण,पुणे प्राधिकृत अधिका-यामार्फत भूधारकांस उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राचा आराखडयाची प्रत **उप जिल्हाधिकारी, (भूसंपादन) क्रमांक २६, पुणे / कार्यकारी अभियंता, पुणे महानगर विकास प्राधिकरण, पुणे** यांच्या कार्यालयामध्ये

कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हित संबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली आली आहे.

५. सदर जाहीर नोटीसीतील खालील अनुसूची मध्ये खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने भूसंपादन करावयाचे गट क्रमांक, संपादित करावयाचे क्षेत्र व संबंधित जमीन मालकाचे नाव नमूद आहे. सदर जाहीर नोटीस ही संपादन मंडळाकडून प्राप्त भूसंपादन प्रस्तावानुसार असून जमिनीच्या संयुक्त मोजणीनुसार येणारे क्षेत्र अंतिमत: विचारात घेण्यात येईल.

६. तसेच सदर जमिनी खरेदी घेण्यासंबंधी काही हरकत असलेस सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून दिवसामध्ये उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्रमांक २६ , पुणे यांचे कार्यालय येथे पुराव्यासह हरकती दाखल कराव्यात. अन्यथा सदर जमीन निर्वेध/निर्जोखमी आहे असे समजून खरेदी करणेची पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

## अनुसूची एक

**खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी घ्यावयाच्या जमिनीचा तपशील**

गावांचे नांव - **मौजे निरगुडी, ता.हवेली, जि.पुणे येथील जमीन प्रारूप विकास योजनेतील ६५ मी. रिंग रोड आणि ९० मी स्पाईन रोड जोड रस्त्याकरीता च्या प्रयोजनासाठी**

| अ.क्र. | गट क्रमांक | गटाचे एकूण क्षेत्र (चौ मी.) | थेट खरेदीने संपादित करावयाचे क्षेत्र (चौ मी.) | संपादित क्षेत्राच्या मालकाचे नांव | दिशा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पुर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | ११० पै | १४७००.०० | २६५६.०० | भिमाजी दत्तात्रय कदम व इतर १ | नदी | ११० पै | १३२ | ११० पै |
| २ | १३० पै | १५०००.०० | २१०५.०० | अनिल जयवंत कदम व इतर ८ | १३१,१३७ | १३० पै | १३७,१३८ | १३२ |
| ३ | १३२ पै | २९४००.०० | १२००६.०० | सिंधुबाई पांडुरंग मुंगसे व इतर ६ | १३२ पै.,१३४ | ११० | १३०,१३१ | ११०,नदी |
| ४ | १३८ पै | १०६००.०० | १९८३.०० | विश्वनाथ एकनाथ कदम व इतर १४ | १३७ | १३८ पै | १४० | १३० |
| ५ | १४० पै | २५८००.०० | १७३३६.०० | अरुणा पोपट ढमढेरे व इतर २४ | १४० पै., १४१ | १४० पै.,१६३ | १४५ | १३७, १३८ |
| ६ | १४१ पै | २५९००.०० | २६५३.०० | ज्ञानेश्वर नामदेव मगर व इतर ७ | १४१ पै | १४० | १४१ पै. | १३७ |
| ७ | १४५ पै | ३२०००.०० | १५६२४.०० | चंद्रकांत रघुनाथ कदम व इतर ४६ | १४५ पै. | १४५ पै. | १४९ | १४०,१६३ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | १४९ पै | २१७००.०० | १८०७८.०० | अलका देविदास मोझे व इतर ६ | १४९ पै. | १४९ पै. | १५०,१६३ | १४५ |
| ९ | १५५ पै | २२२००.०० | २०००६.०० | किसन बाबू कदम व इतर ७ | १५५ पै. | १५५ पै.,१६३ | १५८ | १५०,१६३ |
| १० | १५६ पै | ९५००.०० | ७३९६.०० | रामदास ज्ञानोबा मोझे व इतर ११ | १५६ पै. | १६३ | १५९ | १५५, १६३ |
| ११ | १३४ पै | १२६००.०० | ५३९.०० | भिमाजी दत्तात्रय दिघे व इतर ७ | १३४ पै. | १३२ | १३२ | १३२ |
| १२ | १३१ पै | ४७००.०० | ४५७२.०० | विश्वनाथ एकनाथ कदम व इतर १४ | १३२ | १३० | १३७ | १३२ |
| १३ | १३७ पै | ३०२००.०० | ९६०७.०० | खंडू काशीराम कदम | १३७ पै. | १३०,१३१,१३८ | १४०, १४१ | १३१, १३२ |
| १४ | १५० पै | २८७००.०० | १५२०५.०० | रामदास ज्ञानोबा मोझे व इतर ७ | १५० पै. | १६३ | १५५ | १४९ |
| १५ | १५८ पै | १०४००.०० | २९६४.०० | शिवाजी काळूराम जोरे | १५८ पै. | १५९ | १३६ | १५९ |
| १६ | १५९ पै | ३१३००.०० | ११०७२.०० | केसरबाई मारुती मेंगडे व इतर ४ | १५९ पै., १५८ | १६३ | १५८, १३६ | १५६ |
| १७ | १४८ पै | १३९००.०० | ४०३.०० | इंदुबाई बबन लोखंडे व इतर ६ | | | | |
| १८ | १५४ पै | १२१००.०० | ६.०० | ज्ञानेश्वर नामदेव मगर व इतर ५ | | | | |
| १९ | १४४ पै | ४६००.०० | १०.०० | मधुकर तुकाराम मगर व इतर १४ | | | | |

दिनांक : /०३/२०२५

ठिकाण - पुणे

उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्रमांक २६
पुणे